संक्षिप्त

खान सर अडचणीत; गोळीबारप्रकरणी गुन्हा

पाटणा : देशभरातील स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांमध्ये लोकप्रिय असलेले 'खान सर' म्हणून परिचित शिक्षक फैसल खान यांच्याविरोधात पाटणा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. त्यांच्या कोचिंग संस्थेबाहेर झालेल्या गोळीबार आणि तोडफोड प्रकरणात खान सर यांच्यासह आणखी दोघांना आरोपी करण्यात आले आहे. २ जूनच्या रात्री 'खान ग्लोबल स्टडीज' या कोचिंग संस्थेवर १५ ते २० जणांनी दगडफेक आणि तोडफोड केल्याचा प्रकार घडला होता.

'अमेरिकी सैनिकाचा मृत्यू झाल्यास युद्ध'

वॉशिंग्टन : इराणकडून अमेरिकी सैनिकाचा मृत्यू झाला, तर इराणविरुद्ध पूर्ण युद्ध पुकारण्यासाठी ते प्रबळ कारण असेल, असे वक्तव्य अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केले. व्हाइट हाऊस येथे पत्रकारांशी ते बोलत होते. इराणकडे लष्करी शक्ती राहिलेली नाही, असे ते म्हणाले. ट्रम्प म्हणाले,

स्थलांतरितविरोधासाठी आणखी ७० अब्ज डॉलर

वॉशिंग्टन : अमेरिकेच्या सेनेटमध्ये शुक्रवारी सकाळी स्थलांतरितांसंबंधी असलेल्या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी (आयसीई) गृहसुरक्षा विभागाला अतिरिक्त ७० अब्ज डॉलरचा निधी देण्याचे विधेयक मंजूर करण्यात आले. हे विधेयक आता लोकप्रतिनिधीगृहात मंजुरीसाठी पाठविले जाईल. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना हा मोठा दिलासा मानला जात आहे. सेनेटमध्ये ५२-४७ या फरकाने विधेयकाला मंजुरी मिळाली.

पाकव्याप्त काश्मीरमध्ये २७ जुलैला निवडणूक

इस्लामाबाद : पाकव्याप्त काश्मीरमध्ये (पीओके) २७ जुलै रोजी विधानसभा निवडणूक होणार आहेत. याबाबतची घोषणा पाकिस्तान निवडणूक आयोगाने केली आहे. उमेदवारांना ९ ते १९ जूनदरम्यान उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. अर्जांची छाननी २० जून रोजी होणार असून उमेदवार अर्ज माघारी घेण्याची मुदत ३० जूनपर्यंत आहे.

भारतीय दाम्पत्याची ५५ लाख डॉलरची देणगी

ह्युस्टन : अमेरिकेतील ग्रेटर ह्युस्टन आणि परिसरातील वैद्यकीय सेवांचा विस्तार करण्यासाठी ब्रिज अग्रवाल आणि सुनीता अग्रवाल या भारतीय-अमेरिकन उद्योजक दाम्पत्याने ५५ लाख डॉलर देणगी म्हणून दिले आहेत. या देणगीमुळे 'सेंट ल्युक्स हेल्थ-शुगर लँड हॉस्पिटल'मधील चिकित्सा उपक्रमांना गती मिळणार आहे.

'सुखोई-५७'चे संयुक्त उत्पादन?

भारताला लढाऊ विमानविक्रीविषयी पुतिन यांच्याकडून शक्यता व्यक्त

पीटीआय, सेंट पीटर्सबर्ग

रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांनी पाचव्या पिढीचे अत्याधुनिक लढाऊ विमान सुखोई-५७ पुन्हा एकदा भारताला देऊ केले असून, भारताबरोबर सहउत्पादनही करण्याची रशियाची तयारी आहे, असे म्हटले आहे. दोन्ही देशांतील सामरिक भागीदारी त्यामुळे अधिक मजबूत होईल, असे ते म्हणाले.

रशिया भारताचा दीर्घ काळापासून संरक्षण साहित्याचा पुरवठादार राहिला आहे. पाचव्या पिढीच्या लढाऊ विमानाचा 'अत्याधुनिक बहुउद्देशीय लढाऊ विमान' (एएमसीए) हा स्वदेशी प्रकल्प भारताने हातात घेतला आहे. मात्र, त्यास वेळ लागणार आहे.

या पार्श्वभूमीवर पुतिन यांनी भारताला पुन्हा एकदा रशियाचे सुखोई-५७ लढाऊ विमान देऊ केले आहे. जगभरातील वृत्तसंस्थांच्या पत्रकारांशी त्यांनी संवाद साधला. 'पीटीआय'ने विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना पुतिन म्हणाले, ''सुखोई-५७' विमान आम्ही भारतामध्ये त्यांच्याबरोबरही उत्पादन करू शकतो. रशिया अजूनही भारताने हे विमान घ्यावे, यासाठी आग्रही आहे. हे विमान आताच्या काळाशी सुसंगत आणि अत्याधुनिक आहे. मात्र, आमचा मित्रदेश असलेल्या भारताने या बाबत 'बघू या' असे उत्तर दिले आहे. तत्त्वतः भारत-रशियाचे हे संयुक्त उत्पादन होऊ शकते. आम्ही ते स्वतंत्रपणे तयार केले आहे आणि आम्ही भारतामध्येही काम करू शकतो. कुठल्याही प्रकारची मर्यादा त्यासाठी येणार नाही. हवाई संरक्षण यंत्रणेसाठीही रशियाची भारताबरोबर काम करण्याची तयारी आहे.''

'प्रादेशिक संपर्क यंत्रणेसाठी रशियाकडून २०० विमाने'

मॉस्को : प्रादेशिक संपर्क यंत्रणा मजबूत करण्यासाठी भारत रशियाकडून विमानांच्या खरेदीसाठी आणि २०० विमानांच्या भारतातच निर्मितीसाठी प्रयत्नशील असल्याचे वृत्त रशियाच्या 'टीएएसएस' या वृत्तसंस्थेने दिले आहे. 'युनायटेड एअरक्राफ्ट कॉर्पोरेशन'चे प्रमुख वदिम बडेखा यांनी २९व्या 'सेंट पीटर्सबर्ग इंटरनॅशनल इकॉनॉमिक फोरम'च्या पार्श्वभूमीवर ही माहिती दिली. भारत 'एसजे-१००' आणि 'आयएल-११४-३०० टर्बोप्रॉप' विमानांची खरेदी करण्यास उत्सुक आहे. या विमानांच्या खरेदीसाठी भारताने सर्वप्रथम इच्छा प्रदर्शित केल्याचे ते म्हणाले.

'मोदी दबावापुढे झुकणार नाहीत'

भारत आणि रशियाचे संबंध मर्यादित ठेवण्याचा पाश्चात्त्य देशांच्या प्रयत्नांमुळे जागतिक स्थैर्याला धोका निर्माण होईल, असा इशारा पुतिन यांनी दिला. त्याचवेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी दबावापुढे झुकणार नाहीत असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. मोदींच्या नेतृत्वाखाली भारताचा विकास झाला असल्याची प्रशंसा त्यांनी केली. भारत-रशिया द्विपक्षीय व्यापार १०० अब्ज डॉलरपर्यंत नेण्याचे प्रयत्न असल्याची माहिती पुतिन यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

कर्नाटकमध्ये मंत्र्यांचा राजीनामा

खातेवाटपावरून ज्येष्ठ नेते रामलिंग रेड्डी नाराज

पीटीआय, बंगळूरु

खाते वाटपावरून नाराजी व्यक्त करत कर्नाटकचे मंत्री रामलिंग रेड्डी यांनी पदाचा राजीनामा दिला आहे. याबाबत चर्चेतून मार्ग काढू असे आश्वासन मुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांनी दिले आहे. तर पक्षनेतृत्त्व यातून तोडगा काढेल असा विश्वास गृहमंत्री प्रियंक खरगे तसेच काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दिनेश गुंडुराव यांनी व्यक्त केला.

खातेवाटपात बंगळुरू विकास हा विभाग देण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले होते मात्र सिंचन विभाग देण्यात आल्याचा आरोप रेड्डी यांनी केला. हा अपमान किती काळ सहन करणार, असा सवाल त्यांनी केला. काँग्रेसचे आमदार म्हणून कायम राहू असे त्यांनी स्पष्ट केले. सिद्धरामय्या यांच्याकडून राज्याची धुरा शिवकुमार यांच्याकडे आली. नव्या मंत्र्यांचे खातेवाटप जाहीर केल्यावर ही नाराजी उघड झाली. आठ वेळा आमदार असलेले रेड्डी हे बंगळुरू शहरातून निवडून येतात. कधीही मंत्रीपदाची मागणी केली नव्हती असे त्यांनी स्पष्ट केले.

राजीनाम्याबाबत फेरविचार करणार नसल्याचे रेड्डी यांनी सांगितले. कोणत्याही नेत्याविरोधात वैयक्तिक आकस नसल्याचे त्यांनी नमूद केले. काँग्रेस श्रेष्ठींनी रेड्डी यांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला, मात्र ते निर्णयावर ठाम राहिले. बंगळुरू महापालिकेची निवडणूक लवकरच होणार आहे. रेड्डी यांचा शहरात प्रभाव आहे. त्यामुळे त्यांची नाराजी पक्षाला त्रासदायक ठरू शकते.

दरम्यान रेड्डी यांच्या समर्थकांनी पक्षातील पदांचे सामूहिक राजीनामे दिले आहेत. मुद्दा सत्तेचा नव्हे, तर त्यांना जो शब्द दिला होता तो पाळला पाहिजे अशी मागणीही या समर्थकांनी केली.

मुनिअप्पाही नाराज

रेड्डी यांच्या पाठोपाठ खातेवाटपावरून ज्येष्ठ मंत्री के.एक. मुनिअप्पा हे देखील नाराज आहेत. खातेवाटप करताना ज्येष्ठता लक्षात घेतली नसल्याचे त्यांनी नमूद केले. काँग्रेस नेतृत्त्वाने खातेवाटपात बदल करावेत अशी मागणी त्यांनी केली. मुनिअप्पा यांच्याकडे अन्न आणि नागरी पुरवठा हे खाते देण्यात आले आहे. त्यांचा आग्रह समाजकल्याण किंवा कृषी मंत्रालयासाठी होता.

हुबळीत कार्यकर्त्यांचे आंदोलन

अल्पसंख्याक समाजाच्या सदस्यांनी बी.झेड.झमीर खान यांचा मंत्रिमंडळात समावेश करावा यासाठी शुक्रवारी हुबळीत आंदोलन केले. अल्पसंख्याक समाजावर अन्याय होत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. सिद्धरामय्या यांच्या मंत्रिमंडळात गृहनिर्माण, अल्पसंख्याक कल्याण ही खाती त्यांनी सांभाळली होती. मागणी मान्य झाली नाही तर पुढील निवडणुकीत पक्षाला फटका बसेल असा इशाराही या कार्यकर्त्यांनी दिला.

अण्णामलाई अखेर भाजपमधून बाहेर

तमिळनाडूत नव्या राजकीय चळवळीची घोषणा

चेन्नई : तमिळनाडू भाजपचे माजी प्रदेशाध्यक्ष के. अण्णामलाई यांनी शुक्रवारी पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी त्यांचा राजीनामा मंजूर केला. पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाशी तमिळनाडूच्या राजकीय भूमिकेबाबत मतभेद असल्याने हा निर्णय घेतल्याचे अण्णामलाई यांनी स्पष्ट केले आहे. लवकरच राज्यात नव्या राजकीय चळवळीची सुरुवात करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

अण्णामलाई यांनी सांगितले की, आपण हा निर्णय घाईगडबडीत किंवा अचानक घेतलेला नाही. गेल्या १८ महिन्यांपासून आपले पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांशी मुद्द्यांवर मतभेद होते. आपण ४ डिसेंबर २०२५ रोजीच राजीनामा देण्याची इच्छा व्यक्त केली होती. मात्र नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुका संपेपर्यंत पदावर राहण्याची विनंती पक्षाने आपल्याला केली होती.

''एका सच्च्या कार्यकर्त्याप्रमाणे निवडणुकीची सर्व जबाबदारी पूर्ण केल्यानंतरच मी राजीनामा देत आहे. राजीनामा देण्यापूर्वी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, भाजप अध्यक्ष नितीन नबीन आणि सरचिटणीस बी. एल. संतोष यांची भेट घेतली होती,'' असे अण्णामलाई यांनी सांगितले. राजीनामा दिल्यानंतर काही तासांतच त्यांनी तमिळनाडूच्या पुढील विधानसभा लढवण्यासाठी एका नवीन राजकीय चळवळीची स्थापना करण्याची घोषणाही केली.

'महानिकोबार प्रकल्प एका उद्योगपतीसाठी'

संरक्षणाच्या मुद्द्यावर सरकारचा खोटा प्रचार, राहुल यांचा आरोप

पीटीआय, नवी दिल्ली

महत्त्वाकांक्षी महानिकोबार प्रकल्प हा संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे, हा केंद्र सरकारचा दावा खोटा असून प्रत्यक्षात एका उद्योगपतीच्या फायद्यासाठी हा प्रकल्प राबवला जात असल्याचा आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला आहे. या उद्योगपतीला पर्यावरणाच्या दृष्टीने भारतातील सर्वाधिक संवेदनशील क्षेत्रात हॉटेल आणि कॅसिनो बांधायचे आहेत, असे राहुल गांधी म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे जवळचे मित्र असलेले उद्योगपती गौतम अदानी यांचे नाव न घेता राहुल गांधी यांनी या प्रकल्पावर टीका केली. महानिकोबार प्रकल्पाअंतर्गत 'ट्रान्सशिपमेंट' बंदर बांधत असल्याबाबतही सरकार खोटे बोलत असल्याचे राहुल म्हणाले.

आंतरराष्ट्रीय पर्यावरण दिनानिमित्त राहुल गांधी यांनी शुक्रवारी विविध समाजमाध्यमांच्या खात्यावर काही छायाचित्रे आणि ध्वनिचित्रफिती प्रसिद्ध केल्या. त्यामध्ये ते निकोबारच्या समुद्रात स्कूबा डायव्हिंग करताना, तसेच तेथे काही नागरिकांशी चर्चा करताना दिसत आहेत. राहुल गांधी यांनी नागरिकांसाठी एक याचिका प्रसिद्ध केली, 'लोभाऐवजी पर्यावरणाची निवड', असे त्याचे ब्रीदवाक्य आहे.

भारताच्या उदयाचा राहुल यांना त्रास - भाजप

राहुल गांधी यांना सामरिकदृष्ट्या भारताचा उदय झालेले सहन होत नाही, त्यामुळे ते महानिकोबार प्रकल्पाला विरोध करत आहेत, असे उत्तर भाजपने दिले. इतर देश भारतापेक्षा जास्त शक्तिशाली झालेले राहुल यांना हवे आहे, असा आरोप भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते तुहीन सिन्हा यांनी केला.

मणिपूरमध्ये पुन्हा हिंसाचार, तीन ठार

पीटीआय, इम्फाळ

मणिपूरमधील हिंसाचार पुन्हा एकदा उफाळून आला असून कांगपोकपी जिल्ह्यातील एका गावावर सशस्त्र हल्लेखोरांनी केलेल्या हल्ल्यात एका महिलेसह तिघांचा मृत्यू झाला. हल्लेखोरांनी अनेक मिनिटे गोळीबार केल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले, तर किमान सात घरे आगीत जळून खाक झाली.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी पहाटे सुमारे चार वाजण्याच्या सुमारास सैतू-गामफाझोल उपविभागातील लोइबोल खुल्लेन या गावावर सशस्त्र हल्लेखोरांनी हल्ला चढवला. प्रतिस्पर्धी गटांमध्ये झालेल्या गोळीबारामुळे ग्रामस्थांनी जीव वाचवण्यासाठी जवळच्या जंगलांमध्ये आश्रय घेतला. यात लेटखोंगाम हाओकिप, टिनमेरी हाओकिप आणि जांगमिनलाल हाओकिप यांचा मृत्यू झाला.

मुख्यमंत्री वाय. खेमचंद सिंह आणि उपमुख्यमंत्री नेमचा किपगेन यांनी हल्ल्याचा निषेध केला आहे. निरपराध नागरिकांची हत्या आणि घरे जाळण्याचा प्रकार अत्यंत दुर्दैवी व अस्वीकार्य असल्याचे सांगत दोषींवर कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाईल, असे त्यांनी नमूद केले.

सरकारच्या प्रयत्नांमुळे हरित आच्छादनात वाढ – पंतप्रधान नरेंद्र मोदी

पीटीआय, नवी दिल्ली

''**गेल्या दशकात** सरकारने केलेल्या प्रयत्नामुळे भारतातील हरित आच्छादनात वाढ झाली असून अनेक प्रण्यांच्या संख्येतही भर पडली आहे. सामूहिक प्रयत्न, धोरणे, विज्ञानावरील विश्वास आणि नाविन्यपूर्ण उपक्रम यांच्या माध्यमातून पर्यावरणामध्ये सुधारणा कशी करता येते, हे नागरिकांनी दाखवून दिले,'' असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त त्यांनी नागरिकांना शुभेच्छाही दिल्या.

'एक्स' वरील संदेशात त्यांनी पर्यावरण संवर्धनासाठी तळमळीने कार्य करणाऱ्यांचे कौतुक केले. हा दिवस आपल्याला पर्यावरणाचे रक्षण करण्याच्या आणि शाश्वत विकासाला चालना देण्याच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार करण्याची आठवण करून देतो, असे त्यांनी म्हटले आहे. या संदर्भात गेल्या दशकात सरकारने अनेक उपक्रम राबवल्याचे त्यांनी नमूद केले.

''विशिष्ट प्रजातींच्या पुनरुज्जीवनासाठी केलेले प्रयत्नही उल्लेखनीय आहेत. माळढोक, हिमबिबट्या, स्लॉथ बेअर आणि चित्ते यांच्या संवर्धनासाठी केलेल्या प्रयत्नांनी हे दाखवून दिले आहे की, सातत्यपूर्ण वचनबद्धतेमुळे वन्यजीव आणि परिसंस्थांचे पुनरुज्जीवन करण्यास कशी मदत होऊ शकते,'' असे मोदी म्हणाले.

भारताकडून अमेरिकेचा गैरफायदा, ट्रम्प यांचा आरोप

वॉशिंग्टन : भारताने अनेक वर्षे अमेरिकेच्या व्यापार धोरणांचा फायदा घेतला आहे, असा दावा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गुरुवारी पुन्हा एकदा केला. ''त्यांनी आमच्या कंपन्यांवर प्रचंड कर आकारला आणि आम्ही त्यांच्यावर कोणतेच शुल्क लागू केले नाही,'' असे ट्रम्प ओव्हल कार्यालयात पत्रकारांशी बोलताना म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आपले मित्र असून आम्हाला चांगला व्यापार करार मिळेल असा विश्वासही ट्रम्प यांनी व्यक्त केला. यावेळी ट्रम्प यांनी हार्ले-डेव्हिडसन मोटारसायकलींचे उदाहरण दिले. ते म्हणाले की भारताच्या उच्च आयातशुल्कांमुळे या दुचाकीची भारतात विक्री करणे अमेरिकी उत्पादकांना कठीण झाले. भारताने २०० टक्के आयातशुल्क आकारल्यामुळे कंपनीने भारतात उत्पादन सुरू केले अशी नाराजी ट्रम्प यांनी व्यक्त केली.

LARSEN & TOUBRO

Registered Office: L&T House, Ballard Estate, Mumbai - 400 001
Tel: +91 22 6752 5656 website: www.Larsentoubro.com,
email: IGRC@Larsentoubro.com CIN: L99999MH1946PLC004768
(for the attention of the Equity Shareholders of the Company)

Sub: Transfer of Equity Shares of the Company to Investor Education and Protection Fund (IEPF)

This Notice is published pursuant to the Investor Education and Protection Fund Authority (Accounting, Audit, Transfer and refund) Rules, 2016, as amended ("the Rules"). The Rules, inter-alia provisions for transfer of shares, in respect of which dividend has remained unpaid or unclaimed for seven consecutive years, to the Investor Education and Protection Fund.

NOTICE IS HEREBY GIVEN THAT Larsen & Toubro Limited ('the Company') is required to transfer equity shares held by its shareholders who have not claimed dividend paid by the Company on the said shares consecutively for seven years w.e.f. FY 2018-2019 to Investor Education & Protection Fund (IEPF), pursuant to Section 124(6) of the Companies Act, 2013 read with the Rules made thereunder. The Company has already sent a communication individually to the shareholders concerned for claiming their unpaid / unclaimed dividend latest by August 7, 2026, to avoid transfer of shares to IEPF.

In terms of Rule 6 of the Rules, the Company has also uploaded the relevant details of such shareholders on its website. Shareholders are requested to access the web-link https://investors.larsentoubro.com/ to verify their details and claim such dividend(s) by August 7, 2026. In case the Company does not receive any communication from the shareholders concerned by August 7, 2026, the Company shall initiate transfer of the aforesaid shares to IEPF.

Shareholders may note that both the unclaimed dividend and the shares transferred to IEPF including all benefits accruing on such shares, if any, can be claimed by the shareholders from IEPF after following the procedure prescribed under the Rules. The shareholders may please note that no claim shall lie against the Company in respect of the shares or dividends so transferred to IEPF pursuant to the Rules.

For any further information, the shareholders concerned may contact us at the below address:

Secretarial Department, Larsen & Toubro Limited, L&T House, Ballard Estate, Mumbai 400 001. Tel. 022-6752 5656 E-mail: IGRC@Larsentoubro.com	M/s KFin Technologies Limited, Unit: **LARSEN & TOUBRO LIMITED** Selenium Tower B, Plot No. 31 & 32,Financial District. Nanakramguda, Serilingampally Mandal, Hyderabad - 500032, India Phone No. 040 6716 2222, Toll-free number: 1800-3094-001 Email: einward.ris@kflntech.com

For LARSEN & TOUBRO LIMITED
sd/-
(SUBRAMANIAN NARAYAN) .
COMPANY SECRETARY & COMPLIANCE OFFICER
(ACS 16354)

Place: Mumbai
Date: June 06, 2026

कॅनरा बँक Canara Bank

नोंदणीकृत कार्यालय : क्र. ११२, जे.सी. रोड, बेंगळुरू-५६०००२, कर्नाटक, भारत.
शाखेचा पत्ता : लार्ज कॉर्पोरेट ब्रांच (एलसीबी), ३रा मजला, सुखवाणी बिझनेस हब, नाशिक फाटा, पुणे ४११०३४, महाराष्ट्र, भारत.

गुजरात राज्य, दादरा आणि नगर हवेली केंद्रशासित प्रदेश आणि महाराष्ट्र येथील हॅम रोड प्रकल्पात (बांधकाम सुरू असलेले) सवलतदाराच्या बदलीसाठी स्वारस्याची अभिव्यक्तीकरिता आमंत्रण

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (**'प्राधिकरण'**) डिझाइन, बिल्ड, ऑपरेट आणि ट्रान्सफर (**'डीबीओटी'**) या तत्त्वावर वार्षिक आधारावर विकसित केलेल्या गुजरात राज्य, दादरा नगर हवेली केंद्रशासित प्रदेश आणि महाराष्ट्र येथील रस्त्याच्या आठ पदरीकरणाच्या प्रकल्पासाठी (**'प्रकल्प'**) एका विशेष उद्देश वाहनाला (**'सवलतदार'**) सवलत प्रदान केली. सवलतदाराच्या जागी बदली म्हणून, कॅनरा बँकेने (**'सीबी'**) कर्जदात्यांच्या संघाच्या वतीने (सामूहिकपणे, **'कर्जदाते'**), आवश्यक तांत्रिक आणि आर्थिक क्षमता असलेल्या पात्र संस्थेची (**'निवडलेली संस्था'**) ओळख पटवण्यासाठी एक पारदर्शक बोली प्रक्रिया (**'बोली प्रक्रिया'**) हाती घेण्याचा निर्णय घेतला आहे, जी मूळ सवलतीच्या उर्वरित कालावधीसाठी सवलतदाराच्या जागी बदली म्हणून काम करेल, उर्वरित कामे हाती घेईल/अमलात आणेल आणि कर्जदात्यांची थकबाकी चुकती करेल, हे सर्व बोली आमंत्रित करणाऱ्या दस्तऐवजात (**'बोली प्रक्रिया कागदपत्र'**) आणि सवलत करारामध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार असेल.

सदर या संदर्भात, निविदा प्रक्रिया/आकस्मिक बाबींच्या संबंधात कर्जदारांना सल्ला देण्यासाठी आणि निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी बीओबी कॅपिटल मार्केट्स लिमिटेड (**'बॉबकॅप्स'**) यांची प्रक्रिया सल्लागार (**'प्रक्रिया सल्लागार'**) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

सीबी, कर्जदात्यांच्या वतीने, याद्वारे प्रकल्पातील सवलतधारकाच्या जागी काम करण्यासाठी, आवश्यक तांत्रिक आणि आर्थिक क्षमता असलेल्या इच्छुक बोलीदारांकडून/बोलीदारांच्या संघाकडून स्वारस्य अभिव्यक्ती (**'ईओआय कागदपत्र'**), सीबी आणि बॉबकॅप्स (यापैकी प्रत्येक घटक **'इच्छुक पक्षकार'** म्हणून ओळखला जाईल) यांनी जारी केलेल्या बोली प्रक्रिया दस्तऐवजात नमूद केलेल्या नमुन्याप्रमाणे सादर करण्यास आमंत्रित करत आहे, जो कर्जदात्यांना आणि प्राधिकरणाला स्वीकारार्ह असेल. सवलतधारकाची बदली ही कर्जदात्यांना आणि/किंवा बॉबकॅप्स यांना 'जसे आहे तसे आहे', 'जे आहे, जेथे आहे', 'तिथे जे काही आहे ते' आणि 'कोणत्याही आधाराशिवाय' या तत्त्वावर असेल.

प्रकल्पाच्या संक्षिप्त तपशिलासाठी, ईओआय आणि इतर कागदपत्रांच्या स्वरूपासाठी आणि कोणत्याही पुढील माहिती आणि अद्यतनांसाठी, इच्छुक पक्षकार कॅनरा बँक (www.canarabank.bank.in/tenders) आणि/किंवा बॉबकॅप्स (www.bobcaps.in/tenders) यांच्या वेबसाइट्सचा संदर्भ घेऊ शकतात.

बोली प्रक्रिया दस्तऐवज, ईओआय दस्तऐवज आणि/किंवा बोली प्रक्रियेमध्ये कोणत्याही दुरुस्ती/बदलासाठी, तसेच प्रस्तावित व्यवहाराशी संबंधित पुढील अद्यतनांसाठी, कृपया वर नमूद केलेल्या वेबसाइट्सना नियमितपणे भेट द्या.

कोणताही इच्छुक पक्षकार ईमेल मिळाल्यापासून २ (दोन) कामकाजाच्या दिवसांच्या आत, हार्डकॉपीसह ईओआय (स्वारस्याची अभिव्यक्ती) project.zeta@bobcaps.in आणि cb2551@canarabank.com या ईमेल पत्त्यांवर प्रत्यक्ष सुपुर्दगी, पोस्ट किंवा कुरिअरद्वारे सादर करू शकतो, (इच्छुक पक्षाच्या जोखमीवर आणि खर्चावर) 'जीजे राज्य, डी केंद्रशासित प्रदेश आणि एनएच आणि एमएचमधील रस्ते प्रकल्प हाती घेणाऱ्या सवलतदाराच्या बदलीसाठी स्वारस्याची अभिव्यक्ती' याच्या प्रतिलिपीसह एका मोहोरबंद लिफाफ्यात **'के/ए-सहाय्यक महाव्यवस्थापक, लार्ज कॉर्पोरेट शाखा (एलसीबी) कॅनरा बँक, ३रा मजला, सुखवाणी बिझनेस हब, नाशिक फाटा, पुणे-४११०३४, महाराष्ट्र, भारत' यांना पाठवावे.**

बीओबी कॅपिटल मार्केट्स लिमिटेड BOBCAPS
नोंदणीकृत कार्यालय : १७०४, बी विंग, १७वा मजला, पारिनी क्रेसेन्झो प्लॉट नं. सी-३८/३९, जी ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.

काही स्पष्टीकरण हवे असल्यास, कृपया खालील व्यक्तींशी संपर्क साधा :

संपर्क व्यक्ती	संघटना	मोबाइल नंबर	ईमेल आयडी
श्री. सागर भद्रा	बॉबकॅप्स	+९१ ७६६६४१२३९५	project.zeta@bobcaps.in
श्री. हेमंत गुप्ता	बॉबकॅप्स	+९१ ९८११४३६२७६	
श्री. मुरार यादनिक	कॅनरा बँक	+९१ ७७५५९२६५९१	cb2551@canarabank.com

सीबी, कर्जदाते आणि बॉबकॅप्स हे, बोली प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर, बोली प्रक्रियेतून किंवा तिच्या कोणत्याही भागातून माघार घेण्याचा/स्थगित करण्याचा/रद्द करण्याचा, कोणतीही/सर्व ईओआय (स्वारस्याची अभिव्यक्ती) प्रस्ताव स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा आणि/किंवा बोली प्रक्रियेत किंवा तिच्या कोणत्याही भागात बदल करण्याचा, किंवा कोणत्याही अटींमध्ये बदल करण्याचा अधिकार, कोणतेही कारण न देता आणि कोणत्याही दायित्वाशिवाय राखून ठेवतात. सदर हा प्रस्ताव दस्तऐवज नाही. बोली प्रक्रिया दस्तऐवज जारी केल्याचा अर्थ असा होत नाही की सीबी आणि/किंवा कर्जदाते आणि/किंवा बॉबकॅप्स हे निवडलेल्या पक्षाची निवड करण्यास बांधील आहेत. येथे आणि/किंवा बोली प्रक्रिया कागदपत्रात नमूद केलेल्या व्यवहाराच्या संबंधात, बोली लावणाऱ्यांना/इच्छुक पक्षाला आलेल्या कोणत्याही खर्चासाठी आणि उपक्रमांसाठी सीबी आणि/किंवा कर्जदाते आणि/किंवा बॉबकॅप्स कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत. सदर ही जाहिरात बोली प्रक्रिया कागदपत्रात नमूद केलेल्या अस्वीकरण आणि मर्यादांच्या विषयाधीन आहे.

दिनांक : ०६ जून २०२६
ठिकाण : पुणे

सही/- अधिकृत स्वाक्षरीकर्ता
कॅनरा बँक यांच्यासाठी

Bank of Maharashtra

कॉर्पोरेट कार्यालय : 134/1, 'मॉन्ट क्लेयर', बाणेर-पाषाण लिंक रोड, पाषाण, पुणे -411021. **मुख्य कार्यालय :** 'लोकमंगल', 1501, शिवाजीनगर, पुणे 411005. **टेली.:** 020-71658139
ई-मेल: investor_services@bankofmaharashtra.bank.in,
वेबसाईट : www.bankofmaharashtra.bank.in

सूचना

यानुसार सूचना देण्यात येते की, बँक ऑफ महाराष्ट्राच्या समासदांची 23 वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) पुढील कामकाजाकरिता व्हीडीओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी) / अन्य दुकश्राव्य माध्यम (ओएव्हीएम) पद्धतीने **मंगळवार, 30 जून, 2026 रोजी सकाळी 11.00 वाजता** (भारतीय प्रमाणवेळ) आयोजित करण्यात आली आहे.

अ. क्र	तपशील
	सर्वसाधारण कामकाज
1	31 मार्च 2026 रोजी संपलेल्या वर्षातील बँकेचा लेखापरीक्षित ताळेबंद आणि त्या तारखेस संपलेल्या वर्षातील नफा-तोटा पत्रक, या कालावधीतील बँकेची कार्यपध्दती आणि कामकाज याबाबत संचालक मंडळाचा अहवाल, तसेच बँकेचा ताळेबंद आणि जमाखर्च या संदर्भात लेखापरीक्षकांचा अहवाल, यावर चर्चा करुन त्यास मंजूरी देणे.
2	समभागांवर आर्थिक वर्ष 2025-26 साठी लाभांश जाहीर करणे.
	विशेष कामकाज :
3	श्री. सुशांता कुमार मोहन्ती यांची कार्यकारी संचालक म्हणून नियुक्तीस मान्यता देणे.
4	सूचनेत नमूद केल्यानुसार विविध मार्गांनी एकूण रु. 7500/- कोटींपर्यंत भागभांडवल उभारण्याचा विचार करणे.

टीप :

1 सदर सूचना बँक ऑफ महाराष्ट्र (शेअर्स अ‍ॅण्ड मिटींग्ज) रेग्युलेशन्स 2004 मधील रेग्युलेशन 12 आणि 56(i) आणि कंपनी (मॅनेजमेंट अ‍ॅण्ड अ‍ॅडमिनिस्ट्रेशन) नियम 2014 (सुधारीत) च्या नियम 20 नुसार प्रकाशित करण्यात येत आहे.

2 एमसीए आणि सेबी परिपत्रकांची पूर्तता करण्यासाठी वार्षिक सर्वसाधारण सभा आणि बँकेच्या 2025-26 च्या अहवालाची सॉफ्ट कॉपी फक्त इलेक्ट्रॉनिक पध्दतीने अशा सर्व भागधारकांना पाठविण्यात आली आहे, ज्यांचे ईमेल आयडी बँक / डीपी यांच्याकडे नोंदविण्यात आले आहेत. सभासदांनी नोंद घ्यावी की, बँकेच्या 23 व्या सर्वसाधारण सभेची सूचना बँकेची वेबसाईट www.bankofmaharashtra.bank.in वर आणि स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाईटवर उपलब्ध होतील.

3 बँकेच्या सभासदांना या बैठकीत फक्त व्हीसी/ओएव्हीएम् सुविधेद्वारा बैठकीत सहभागी होता येईल. व्हीसी/ ओएव्हीएम् सुविधेद्वारे बैठकीत सहभागी होणाऱ्या सभासदांची मोजणी बैठकीची उपस्थिती नोंदविण्यासाठी करण्यात येईल. व्हीसी/ओएव्हीएम् सुविधेद्वारे सामील होऊन सहभागी होण्यासंबंधीच्या सूचना एजीएम सूचनेमध्ये देण्यात आल्या आहेत.

4 एमसीए परिपत्रकातील अटींनुसार सभासदांना बैठकीस प्रत्यक्ष हजर राहण्याचे बंधन नाही त्यामुळे आपला प्रतिनिधी नियुक्त करण्याची आवश्यकता नाही.

5 बँकेच्या ज्या सभासदांनी त्यांचे ईमेल आयडी बँक/डिपॉझिटरीज् यांच्याकडे नोंदविलेले नाहीत, त्यांना इलेक्ट्रॉनिक पध्दतीने investor_services@bankofmaharashtra.bank.in किंवा mparase@mcsregistrars.com येथे ई-मेल पाठवून एजीएमची सूचना आणि वार्षिक अहवाल प्राप्त करुन घेता येईल.

इलेक्ट्रॉनिक पध्दतीने मतदान :

6 सभासदांनी कृपया याची नोंद घ्यावी की, सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अ‍ॅण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स 2015, मधील रेग्युलेशन 44 अनुसार बँकेने दूरस्थ ई-मतदान आणि बैठकीचे कामकाज पूर्ण करण्याची सुविधा सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (सीडीएसएल) यांच्यामार्फत उपलब्ध करुन दिली आहे, जी गुरुवार, 25 जून 2026 रोजी सकाळी 9.00 वाजता सुरु होईल आणि सोमवार, 29 जून 2026 रोजी 5.00 वाजता समाप्त होईल आणि त्यानंतर ई-मतदानची सुविधा बंद होईल.

7 'कट-ऑफ' तारखेला (म्हणजेच 23 जून 2026 रोजी) बँकेचे समभाग प्रत्यक्ष (physical) किंवा अप्रत्यक्ष (dematerialized) स्वरूपात धारण करणारे भागधारक, परिस्थितीनुसार, दूरस्थ ई-मतदान प्रक्रियेद्वारे कार्यसूचीतील (agenda) बाबींवर मतदान करण्यास पात्र असतील.

8 सभासदांनी दूरस्थ ई-मतदान केल्यानंतरदेखील त्याला / तिला व्हीसी / ओएव्हीएम् द्वारे बैठकीत सहभागी होता येईल, पण त्यांना बैठकीत पुन्हा मतदान करण्याची अनुमती मिळणार नाही.

9 सभासदांना विनंती करण्यात येते की, त्यांनी एजीएमच्या सूचनेत ई-मतदानासंदर्भात देण्यात आलेल्या सूचना वाचाव्यात.

10 बैठकीच्या कार्यपत्रिकेनुसार बैठकीत होणाऱ्या निर्णयांची माहिती निरीक्षक यांच्या अहवालासह बँक आणि सीडीएसएल यांच्या वेबसाईटवर बैठकीच्या अध्यक्षांनी किंवा लेखी स्वरुपात प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने जाहीर केल्यानंतर त्वरित प्रकाशित करण्यात येईल. सदरचे निकाल लगेचच स्टॉक एक्स्चेंजेसला पाठविण्यात येतील.

बँक ऑफ महाराष्ट्र करिता
सही/-
(विशाल सेठिया)
कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी

दिनांक : 06 जून, 2026
ठिकाण : पुणे